Fit India Movement कार्यक्रमाची
अंमलबजावणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः क्रीडायो-२०१९/प्र.क्र.१९०/क्रीयुसे-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
तारीख- २३ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

केंद्र शासनाचे सचिव, क्रीडा विभाग, नवी दिल्ली यांनी सर्व राज्याचे मुख्यसचिव यांना लिहीलेले अर्ध शासकीय पत्र क्रमांक ३१-१/MYAS/MDSD/२०१९, दिनांक २०/८/२०१९.

शासन परिपत्रक :-

समाजामधील प्रत्येक नागरीकाने शारीरीक व्यायाम करावा अथवा खेळामध्ये भाग घ्यावा व प्रकृती स्वास्थ राखावे यासाठी केंद्र शासनामार्फत संपूर्ण देशामध्ये Fit India Movement या कार्यक्रमाचे अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ या राष्ट्रीय खेल दिनाच्या मुहुर्तावर Fit India Movement या योजनेचा शुभारंभ मा.पंतप्रधान यांचे हस्ते इंदिरा गांधी स्टेडीयम, नवी दिल्ली येथून करण्यात येणार आहे. यावेळी मा. पंतप्रधान शारीरीक तंदुरुस्तीबाबत शपथ देतील. सदर शपथ दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी १०-०० वा. दुरदर्शनवरुन सर्व जनतेला देण्यात येणार आहे.

याबाबत खालीलप्रमाणे सूचना सर्व संबंधीत यंत्रणांना देण्यात येत आहे.

१) सर्व शाळा व महाविद्यालयातील तसेच विद्यापीठातील विद्यार्थ्यांना, त्यावेळी शपथ घेण्यासाठी संबंधीत शाळांनी आवश्यक ती व्यवस्था करावी. यावेळी सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

२) सर्व ग्रामपंचायत / नगर परिषद/ महानगरपालिकेतील सदस्यांनी शारीरीक तंदुरुस्तीबाबत शपथ घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात / सभागृहात आवश्यक ती व्यवस्था करावी. त्यावेळी गावातील/ शहरातील जास्तीत जास्त नागरीक उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. मान्यवर खेळाडू/ सामान्य नागरिक /अन्य मान्यवर व लोकप्रतिनिधींना निमंत्रित करावे.

३) गावागावात महिला व पुरुषांसाठी सकाळचे चालणे (Morning Walk), तरुणांसाठी धावण्याच्या छोटया अंतराच्या मॅरेथॉन शर्यती, योगा इ. शारीरीक व्यायाम होणारे उपक्रम आयोजित करावेत.

४) नेहरु युवा केंद्रामार्फत व संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांचेमार्फत त्यांच्या योजनेमध्ये सहभागी असलेल्या युवकांना एकत्रित करुन शपथ घेण्यासाठी आवश्यक ते नियोजन करावे. एन.सी.सी./ स्काऊट अँड गाईड मध्ये सहभागी विद्यार्थी/ विद्याथीनी, कर्मचारी वर्ग यांचासुद्धा सहभाग असावा.

५) दिवसभरात विद्यार्थी, युवक, महिला व पुरुष यांचेकरीता विविध खेळांचे आयोजन करण्यात यावे.

वरील सूचना सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्याअधिपत्याखालील यंत्रणांच्या निदर्शनास आणून राबवण्यिात येत असलेल्या उपक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना द्याव्यात व सूचनांची अंमलबजावणी होईल याची खातरजमा करावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०८२६१०४९०८१७२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.08.26 11:00:39 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक, मुंबई.
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२.जिल्हाधिकारी (सर्व)
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१४. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
१५.संचालक, शिक्षण (प्राथमिक), पुणे

१६.संचालक, शिक्षण (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
१७.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९.संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई
२०.महासंचालक, राष्ट्रीय छात्र सेना, मुंबई
२१.महासंचालक, स्काऊट अँड गाईड, मुंबई
२२.सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे
२३. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, सर्व विभाग (क्रीडा संचालनालयामार्फत)
२४.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
२५.सर्व महानगरपालिका/ नगरपरिषदा/ ग्रामपंचायत
२६.निवड नस्ती (क्रीयुसे-१/ २/ ३).